मिहान प्रकल्पास सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्र. मविवि-१२२४/प्र.क्र.१३५/विमान-१**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई- ४००-०३२
दिनांक- ०४ ऑक्टोबर, २०२४

**वाचा:-**

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एव्हीएन- १००१/प्र.क्र.१०५/२००१/२८-अ, दिनांक ०४.०१.२००२
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र एव्हीएन-१००५/प्र.क्र.१६६/०५/२८-अ, दिनांक २६.०६.२००६
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एव्हीएन-१००५/प्र.क्र.१६६/०५/२८-अ, दिनांक ४.०७.२००९
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. एव्हीएन-१००८/प्र.क्र. १७१/०८/२८-अ, दिनांक १०.०३.२०१०
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मिहान-२०१०/ प्र.क्र.६४६/२८-अ, दिनांक ७.१०.२०११
६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मिहान-२०१०/प्र.क्र.६४६/२८-अ. दिनांक ०३.०३.२०१२
७. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र मिहान-२०११/ प्र.क्र.२६५/२८-अ, दिनांक ३०.०३.२०१२
८. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मिहान-२०१२/ प्र.क्र.३९९/२८-अ, दिनांक १२.१०.२०१५
९. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मिहान-२०१९/ प्र.क्र.२५/२८-अ, दिनांक ०७.०९.२०१९
१०. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र. १९५९/मिहान/ २०२४/ २१५, दि.०८.०५.२०२४
११. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र. ४०९७/मिहान/ जमीन/२०२४/८/७८८, दि.१२.०९.२०२४

**प्रस्तावना:**

नागपूर येथे आंतरराष्ट्रीय प्रवासी व माल वाहतूक हब विमानतळ विकसित करण्याच्या उद्देशाने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.४.०१.२००२ अन्वये, मिहान प्रकल्पासाठी मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून, त्यानंतर मिहान प्रकल्पाबरोबरच मुल्यवर्धी आर्थिक उलाढालीचा विकास करण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) विकसित करण्यासह वेळोवेळी प्रकल्पात झालेल्या सुधारणांनुसार दि.२६.६.२००६, दि.४.७.२००९, दि.३.३.२०१२, दि.३०.३.२०१२, दि.१२.१०.२०१५ व दि.०७.०९.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये सुधारित प्रशासकीय /वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

२. तथापि, मिहान प्रकल्पाकरीता आवश्यक असलेले भूसंपादन, पुनर्वसन विषयक तांत्रिक कामे व भूसंपादन अधिनियमाचे कलम- १८ व कलम- २८ अंतर्गत करण्यात आलेल्या दाव्यांकरीता रु.१४९३.९६ कोटी इतका अतिरिक्त निधी मंजूर करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने शासनास सादर केला होता. सदर प्रस्तावास मान्यता मिळण्याच्या अनुषंगाने मंत्रिमंडळ प्रस्ताव मा. मंत्रिमंडळाच्या दि. ३०.०९.२०२४ रोजीच्या बैठकीत सादर करण्यात आला. सदर बैठकीत मा.मंत्रिमंडळाने मिहान प्रकल्पातील भूसंपादन, प्रकल्पग्रस्ताचे पुनर्वसन, भूसंपादन अधिनियमाचे कलम- १८ व २८ अंतर्गत करण्यात आलेले दावे, फास्ट ट्रॅक कोर्टाकरिता

केलेला खर्च तसेच आस्थापना विषयक बाबी इत्यादि कामांकरिता रु. ३९९४.४१ कोटी इतक्या रकमेस सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात आली. यानुसार मिहान प्रकल्पास सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्याबाबत खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय**

मिहान प्रकल्पातील विविध कामांकरिता रु. १४९३.९६ कोटी इतक्या रकमेच्या अतिरिक्त खर्चास शासन मान्यता देण्यात येत असून मिहान प्रकल्पासाठी येणाऱ्या एकूण रु. ३९९४.४१ कोटी इतक्या अपेक्षित खर्चास शासनाची सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश आहे.

१) प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन याकरीता रु. ९१३.८६ कोटी इतक्या खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२) मिहान प्रकल्पांतर्गत भूसंपादनासाठी रु. ८०९.६४ कोटी इतक्या खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

३) मिहान प्रकल्पाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या भूसंपादन निवाडा विरोधात भूसंपादन कायदा कलम- १८ खाली मा.न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या दाव्यांसाठी रु.१३००.०० कोटी इतक्या खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. तसेच दिवाणी न्यायालयात कलम-१८ नुसार वाढीव नुकसान भरपाई मिळण्याच्या अनुषंगाने कलम-२८ करीता दाखल दाव्यांसाठी रु. ५९५.०० कोटी इतक्या खर्चास सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

४) मिहान प्रकल्पांतर्गत फास्ट ट्रॅक कोर्टाच्या खर्चासाठी रु. २.२३ कोटी इतकी सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

५) महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीचा आस्थापना खर्च ४ टक्के वाढ म्हणून रु.१५३.६३ कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

मिहान प्रकल्पासाठी आवश्यक सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबतचे विवरणपत्र **परिशिष्ट-अ** शासन निर्णयासोबत जोडलेले आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०२४१००४१९०९०१३७०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

BHARAT BUDHAJI GAWADE

Digitally signed by BHARAT BUDHAJI GAWADE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=bc303d0b23c9b2e645645466613634 00c4a360e6c6fbdefca273e2f5d2a43be7, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF4E3993E4DD3610FCB21AECE361E641AD3D33D96F04D57673C4FCA72EB10C92, cn=BHARAT BUDHAJI GAWADE
Date: 2024.10.07 10:52:38 +05'30'

**( भ. बु. गावडे )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

५. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. अप्पर मुख्य सचिव (विमानचालन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
९. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई
१०. महालेखापाल, (लेखा परीक्षा / लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
११.जिल्हाधिकारी, नागपूर
१२. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या. २५), मंत्रालय, मुंबई
१३. उप संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
१४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६. अतिरिक्त जिल्हाधिकारी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई
१७. निवड नस्ती, विमान-१, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई.

शासन निर्णय क्र.मविवि-१२२४/प्र.क्र.१३५/विमान-१, दिनांक ०४.१०.२०२४ सोबतचे

**परिशिष्ट "अ"**

मिहान प्रकल्पासाठी आवश्यक सुधारीत प्रशासकीय व वित्तीय मान्यतेचा तक्ता खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

**(रुपये कोटीमध्ये)**

| अ.क्र | खर्चाची बाब/प्रस्ताव | सध्याची प्रशासकीय व वित्तिय मान्यता | अपेक्षित वाढीव निधी (अंदाजे) | अपेक्षित संभाव्य खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ (३+४) |
| १ | मिहान प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन | ८७९.८६ | ३४.०० | ९१३.८६ |
| २ | दिवाणी न्यायालयातील वाढीव नुकसान भरपाईबाबतचे कलम- १८ अंतर्गत दाखल दावे | ६००.०० | ७००.०० | १३००.०० |
| ३ | दिवाणी न्यायालयातील कलम- १८ नुसार वाढीव नुकसान भरपाई मिळण्याच्या अनुषंगाने कलम-२८ अंतर्गत दाखल दावे | ९५.०० | ५००.०० | ५९५.०० |
| ४ | भूसंपादन | ७०४.३१ | १०५.३३ | ८०९.६४ |
| ५ | भारतीय वायुदलाच्या मौजा जयताळा येथील पोच रस्ता बांधकामासाठी | ५०.०० | ००.०० | ५०.०० |
| ६ | झुडपी जंगल जमिनीचे निर्वनीकरण | ०२.३८ | ००.०० | ०२.३८ |
| ७ | फास्ट ट्रॅक कोर्टाची स्थापना | ०१.२३ | १.०० | ०२.२३ |
| ८ | सानुग्रह अनुदान | | | |
| | अ) खापरी येथील भूसंपादनातून सुटलेल्या ५९ घरांचा सानुग्रह अनुदान प्रस्ताव. | ०६.५२ | ००.०० | ०६.५२ |
| | ब) कलकुही, दहेगांव, तेल्हारा या गावांतील गावठाणाबाहेरील २२७ अतिक्रमित जागेवरील घरांचा सानुग्रह अनुदान प्रस्ताव. | ०१.५३ | ००.०० | ०१.५३ |
| | क) शिवणगांव येथील गावठाणातील व गावठाणाबाहेरील ५६८ अतिक्रमित जागेवरील घरांचा सानुग्रह अनुदान प्रस्ताव. | २०.५३ | ००.०० | २०.५३ |
| ९ | सिडकोच्या मेघदूत प्रकल्पाच्या विकास आराखडयासाठी व प्रशासकीय खर्च म्हणून सिडकोने खर्च केलेल्या निधीची प्रतिपूर्ती करणे. | ०२.६९ | ००.०० | ०२.६९ |
| १० | प्रकल्पखर्चात १० टक्के वाढ गृहीत धरून होणारी रक्कम. | १३६.४० | ००.०० | १३६.४० |
| ११ | म.वि.वि.कंपनीचा आस्थापना खर्च (अ.क्र.१ ते १० या बाबींच्या खर्चाच्या रक्कमेवर ४ टक्के नुसार येणारी रक्कम ) | ००.०० | १५३.६३ | १५३.६३ |
| | **एकूण** | **२५००.४५** | **१४९३.९६** | **३९९४.४१** |